# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176
**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/५७३/२०११ दि. १५ जून २०११

वृत्त प्रसिध्दीसाठी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात आयोजित थिंक टॅंक बैठकीतील सूर.

## "संशोधनाला अधिक सक्षम करण्यासाठी पाऊले उचलावीत"

**नाशिक (दि.१५)** - विद्यापीठाने संशोधन वैद्यकीय शिक्षण कार्याबरोबरच संशोधन करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलून योग्य नियोजन करावे असा सूर आज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे आयोजित थिंक टॅंक समितीच्या बैठकीत निघाला.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रति कुलगुरु मा.डॉ.अशोक कुलकर्णी होते. तसेच याप्रसंगी कुलसचिव डॉ. आ.ना. सूर्यकर, पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल येथील स्त्रीरोग व वंधत्व तज्ज्ञ डॉ. आनंद शिंदे, हिंदुजा हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबईचे संचालक डॉ.जी.एन. दावर, नॅशनल एड्स रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे येथील डॉ. आर.एस. परांजपे, नाशिकचे डॉ. शाम अष्टेकर, जेनेटिक्स हेल्थ ॲण्ड रिसर्च सेंटर, नाशिकचे डॉ. डी.के. चोपडे यांनी सहभाग नोंदविला.

यावेळी विद्यापीठाचे प्रति कुलगुरु मा.डॉ. अशोक कुलकर्णी यांनी सांगितले की, विद्यापीठाने अनेक प्रकारचे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु केले आहे. संशोधनाला चालना मिळण्याकरीता विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी उपस्थितांना विद्यापीठाच्या अनेक उपक्रमांबाबत अवगत केले. वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जा बरोबरच वैद्यकीय सेवेच्या दर्जात वाढ व्हावी या दृष्टीने वैद्यकीय व इतर क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केलेल्या तसेच समाजसेवा / आरोग्य सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांच्या अनुभवाचा शिदोरीचा फायदा व्हावा या हेतूने एका समितीचे गठण करण्यात आले आहे. या गठित करण्यात आलेल्या तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींच्या थिंक टॅंक समितीच्या बैठकीचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले असल्याचे सांगितले. या विचार बैठकीमध्ये मांडलेल्या सूचनांचा विद्यापीठ विचार करुन त्याअनुषंगाने कार्यवाही करणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विद्यापीठाने अल्प कालावधीमध्ये वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली आहे. शिक्षणाच्या दर्जाबरोबरच सामजिक वैद्यकीय सेवेच्या दर्जात वाढ व्हावी ही मुलभूत कल्पना थिंक टॅंक स्थापन करण्यामागे आहे. विद्यापीठाचा २०११-१६ कालावधीचा बृहत आराखडा तयार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. यासाठी राज्यामध्ये विभागीय बैठका घेण्यात येऊन लोकप्रतिनिधी, संस्थाचालक, प्राचार्य, विविध क्षेत्रातील मान्यवर आदींचा समावेश यात होता. बृहत आराखडयाला अंतिम स्वरुप देऊन योग्य दिशा देण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीच्या सुरुवातीला उपस्थित मान्यरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्या आले. यावेळी नियोजन मंडळाचे प्रभारी संचालक श्री. संजय नेरकर यांनी विद्यापीठाच्या बृहत आराखडयाचे सादरीकरण केले. बैठकीचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी श्री. स्वप्नील तोरणे यांनी केले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपले विचार प्रकट केले. डॉ. आनंद शिंदे यांनी सांगितले की, भारतामध्ये सुदृढ तरुण मातेच्या मृत्यू ही अतिशय गंभीर आणि चिंताजनक बाब असल्याचे सांगून हेच प्रमाण युरोपिय देशांमध्ये अतिशय कमी आहे. कारण तेथील संस्थामध्ये थिंक टॅंकचा विचार होऊन त्याप्रमाणे तेथील सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रादेशिक क्षेत्रामध्ये महिलांच्या आरोग्याबाबत योजना राबविल्या जातात. भारतामध्ये माता मृत्यूचे महत्वाचे कारण म्हणजे मूलभूत सोयी सुविधा, मार्गदर्शनाचा अभाव आहे.

डॉ. शाम अष्टेकर यांनी सांगितले की, विद्यापीठाने मराठी भाषेमध्ये आरोग्य पेढी तयार करावी, या आरोग्य पेढीमध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालक, वाचक यांच्या करीता प्रमाणित माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याच प्रमाणे पॅरामेडिकल कोर्सेस सुरु करणे, सार्वजनिक आरोग्य आणि आरोग्य व्यवस्थेचे संशोधन कार्यक्रम राबवावे, आंतरविद्याशाखा संशोधन, ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा विकासाकरीता नियोजन करावे असेही त्यांनी सांगितले

पुण्याच्या नॅशनल एड्स रिसर्च इन्स्टिटयूट येथील डॉ. आर.एस. परांजपे यांनी सांगितले की, वैद्यकीय क्षेत्राचा विकास हा अतिशय झपाटयाने होत आहे. इतर देशांच्या मानाने भारतामध्ये खूप कमी प्रमाणात संशोधन होत आहे. त्यासाठी विद्यापीठाने संशोधनासाठी नियोजन करावे. याकरीता संशोधन करणाऱ्यास शिष्यवृत्ती द्यावी. संशोधनाकरीता विविध साधने आणि विशिष्ट पध्दतीचा अवलंब करावा. विद्यापीठाने आपला आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नवनवीन योजना आखण्यासाठी माहिती मागवून व त्याबाबत सूचना देण्याकरीता नियोजन करावे असेही त्यांनी सांगितले.

मुंबई येथील हिंदुजा हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरचे संचालक डॉ.जी.एन. दावर यांनी सांगितले की, विद्यापीठाने आपला अधिक चांगला विकास करण्यासाठी दर्जेदार पदव्युत्तर व सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम, विविध प्रकारचे फेलोशिप कार्यक्रम, आपली कार्य पद्धती न बदलता त्यात अधिक सुधारणा करणे, विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करावी असे सांगितले.

नाशिक येथील जेनेटिक्स हेल्थ ॲण्ड रिसर्च सेंटरचे डॉ. डी.के. चोपडे यांनी सांगितले की, विद्यापीठाने वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय सेवेबरोबरच रुग्णाचा देखील विचार करावा. रुग्णांना कठिण प्रसंगी येणाऱ्या विविध अडचणी, विविध प्रश्न आदींचा विचार करावा. याकरीता विद्यापीठाने हेल्थ जर्नलिझ्म आणि हेल्थ कम्युनिकेशन सारखे अभ्यासक्रम सुरु करावे असे मत व्यक्त केले.

कुलसचिव



महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात आयोजित थिंक टॅक बैठकीस उपस्थित विद्यापीठाचे प्रति कुलगुरु मा.डॉ.अशोक कुलकर्णी समवेत कुलसचिव डॉ. आ.ना. सूर्यकर, डॉ. आनंद शिंदे, डॉ.जी.एन. दावर, डॉ. आर.एस. परांजपे, डॉ. शाम अष्टेकर, डॉ. डी.के. चोपडे, श्री. संजय नेरकर आणि श्री. स्वप्नील तोरणे.